# 'मुकुल माधव फाउंडेशन'तर्फे विशेष मुलांना अनोखी भेट

**मुंबई :** गल्फ लुब्रिकंट्स इंडिया लिमिटेडने फिनोलेक्स इंडस्ट्री लिमिटेडचा 'सीएसआर' प्रकल्प असलेल्या मुकुल माधव फाउंडेशनसोबत भागीदारी केली आहे. याअंतर्गत अपंग कल्याणकारी शिक्षण संस्थेच्या विशेष मुलांना विशेष भेट देण्यात आली. या मुलांना पुणेस्थित आयपीएफ फ्रेंचाईजीच्या रायजिंग पुणे सुपर जायंटच्या खेळाडूंसोबत संवाद साधता यावा म्हणून कार्यक्रमाचे आयोजन केले होते. स्टीव्हन स्मिथ, फाफ दु प्लेसिस आणि जयदेव उनाडकत हे स्टार खेळाडू यावेळी उपस्थित होते.